जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचेकार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोटक्रमांक :- ३०२ दिनांक :- २७/१०/२०२१

# “मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत पेल्हार पोलीस स्टेशनचे उद्‌घाटन”

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय आस्थापनेवर असलेल्या वालीव पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्राचे विभाजन करून प्रस्तावित पेल्हार पोलीस स्टेशनचे आज दिनांक २७/१०/२०२१ रोजी मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांचे उपस्थितीत महिला पोलीस अमंलदार श्रीमती ज्योती येरणकर यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले आहे. वालीव पोलीस स्टेशन हद्दितील वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढलेल्या गुन्हेगारीचे प्रमाण नियत्रंणात आणण्याच्या दृष्टीने नवीन पोलीस ठाण्याची निर्मीती करणे आवश्यक झाले होते. सदर बाबींची आवश्यकता लक्षात घेवून मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय आस्थापनेमध्ये वालीव पोलीस ठाणे कार्यक्षेत्राचे विभाजन करून पेल्हार या नवीन पोलीस ठाण्याचे उद्‌घाटन करण्यात आले आहे. नवीन पोलीस ठाण्याची निर्मीती झाल्याने सदर भागामध्ये गुन्हेगारीवर नियंत्रण येवून गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढणार आहे. पेल्हार पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक श्री. विलास चौघुले यांची नेमणूक करण्यात आलेली असून पेल्हार पोलीस ठाणेचा संपर्क क्रमांक २५०-२९९१४०० असा आहे.

सदर पोलीस स्टेशनच्या उद्‌घाटन प्रसंगी मा. पोलीस आयुक्त श्री सदानंद दाते, मा. अपर पोलीस आयुक्त श्री एस. जयकुमार, मा. पोलीस उप आयुक्त डॉ. श्री महेश पाटील, श्री संजयकुमार पाटील, श्री प्रशांत वाघुंडे व इतर पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते.





----ooo----